SJIF Impact Factor - 5.54

E- ISSN 2582-5429

AKSHARA

Multidisciplinary Research Journal

Peer-Reviewed & Refereed International Research Journal

February 2022 Special Issue 04, Vol. VI (C)

# CONTEMPORARY TRENDS IN HUMANITIES, COMMERCE AND LIBRARY SCIENCE (CTHCLS 2022)

Guest Editor

**Dr. Ganesh Anant Thakur**

Principal

Mahatma Phule Arts, Science and Commerce College, Panvel.

District. Raigad. Maharashtra. 410206

Executive Editor

**Mr. Sopan L. Gove**

IQAC Co-ordinator

M.P.A.S.C. College, Panvel

Associate Editor

**Mr. Sunil S. Avachite**

Librarian

M.P.A.S.C. College, Panvel

Chief Editor : Dr. Girish S. Koli, AMRJ

For Details Visit To - www.aimrj.com

Akshara Publication

Scanned with OKEN Scanner

E- ISSN 2582-5429
AMRJ
Akshara Multidisciplinary Research Journal
Peer-Reviewed & Refereed International Research Journal
February 2022 Special Issue 04 Volume VI (C) SJIF Impact- 5.54

# Index



| Sr.No. | Title of the paper | Author's Name | Pg.No |
|---|---|---|---|
| 1 | जागतिकीकरण आणि नवसंवेदन | डॉ. विद्या नावडकर | 05 |
| 2 | उत्तर आधुनिकतावादाच्या अनुषंगाने नव्वदोत्तर मराठी अनियतकालिकांमधील कविता या साहित्यप्रकाराची चिकित्सा | प्रा. प्रवीण गायकर | 09 |
| 3 | 'ओरबिन'- औद्योगिकीकरणाचे भीषण वास्तव (गजानन देसाई) | डॉ. वर्षा फाटक | 13 |
| 4 | आधुनिक मराठी ग्रामीण कविता | डॉ. अतुल चौरे | 16 |
| 5 | उत्तर आधुनिकता आणि आदिवासी साहित्य | प्रा. अनिल वळवी | 20 |
| 6 | आधुनिक मराठी साहित्य-नाटक साहित्यप्रकार | प्रा, दीपक गडकर | 24 |
| 7 | आदिवासी कवितेची वाटचाल | डॉ. सोनू लांडे | 28 |
| 8 | कोरोना महामारीचा नाशिक जिल्ह्यातील कृषी पर्यटनावर झालेला परिणाम | वाघ जीवनकुमार शामराव | 31 |
| 9 | कोविड काळात भारतातील स्थूल देशांतर्गत उत्पादनाचे विश्लेषण | प्रा. संतोष गोरवे | 35 |
| 10 | कृषी संशोधनाची कृषी विकासातील भूमिका संदर्भ: प्रादेशिक संशोधन केंद्र कर्जत, जिल्हा. रायगड, महाराष्ट्र | डॉ. रमेश पदु म्हात्रे | 39 |
| 11 | भारतातील कृषी संशोधनाची कृषी विकासातील भूमिका | श्री कांतीलाल शंकर पाटील<br>डॉ. अनिल नारायण पाटील | 44 |
| 12 | आदिवासी महिलांच्या शाश्वत विकासासाठी शासनाच्या शैक्षणिक योजना: संदर्भ पनवेल तालुका | सौ. सुचिता रमेश म्हात्रे<br>डॉ. डी. व्ही. पवार | 48 |
| 13 | भारताच्या आर्थिक विकासात सागरी मत्स्य व्यवसायाची भूमिका | सिताफुले एल .एस . | 53 |
| 14 | कृषी संशोधनाची कृषी विकासातील भूमिका संदर्भ : कृषी संशोधन केंद्र पालघर | डॉ. जयवंत काशिनाथ पाटील | 58 |
| 15 | महाराष्ट्रातील शैक्षणिक सुधारणा चळवळीचा इतिहास | डॉ. शिंदे भानुदास धोंडीबा | 61 |
| 16 | भारतीय लोकशाही समोरील आव्हाने | डॉ. सुनिल लक्ष्मण परदेशी | 64 |
| 17 | महात्मा गांधीजींच्या अहिंसेची वर्तमानकाळाच्या संदर्भात विज्ञाननिष्ठ प्रासंगिकता | डॉ. गणेश शंकर विधाटे | 66 |
| 18 | १९६२ चे चीनचे आक्रमण व यशवंतराव चव्हाणांची भूमिका | डॉ. राजश्री निकम | 69 |
| 19 | रायगड जिल्ह्यातील आदिवासी समाजाच्या आर्थिक समस्या | डॉ. पाथरकर एस. व्ही. | 73 |
| 20 | भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील विद्यार्थ्यांचे योगदान | प्रा. शिंदे नरायण अंबू | 76 |
| 21 | इंदिरा गांधी यांचे जीवन व कार्य एक चिकित्सक अभ्यास | डॉ. रविंद्र बाबुराव जाधव | 78 |
| 22 | जागतिक राजकारणातील समकालीन समस्या | प्रा. डॉ. पराग गोविंद पाटील | 81 |





Scanned with OKEN Scanner

E- ISSN 2582-5429
AMRJ
Akshara Multidisciplinary Research Journal
Peer-Reviewed & Refereed International Research Journal
February 2022 Special Issue 04 Volume VI (C) SJIF Impact- 5.54

17

# महात्मा गांधीजींच्या अहिंसेची वर्तमानकाळाच्या संदर्भात विज्ञाननिष्ठ प्रासंगिकता

डॉ. गणेश शंकर विधाटे
इतिहास विभाग,
राधाबाई काळे महिला महाविद्यालय, अहमदनगर ता. जि. अहमदनगर. ४१४००१

**प्रस्तावना:**

महात्मा गांधीजी हे भारतीय होते, परंतु ते भारतीय भूमीपर्यंत मर्यादित राहिले नाहीत. आपल्या विचार व कृतीप्रवणतेच्या जोरावर ते आंतरराष्ट्रीय ख्यातीचे नेते बनले. इतिहासात अशी उदाहरणे क्वचितच पहावयास मिळतात, की एखादया व्यक्तीचा प्रशासनाशी दूरवर काही संबंध नसतो आणि ती व्यक्ती सत्य आणि अहिंसेच्या शक्तीने शेकडो वर्षांपूर्वीच्या साम्राज्याला केवळ हादरवूनच सोडत नाही, तर त्या साम्राज्याला परास्त करून देशभक्तांच्या हृदयात स्वातंत्र्याचा उत्साह देखील निर्माण करते. महात्मा गांधीजी हे त्याचे सर्वोत्तम उदाहरण आहे. विज्ञान ते अध्यात्म अशा सर्व क्षेत्रात महात्मा गांधी हे व्यक्तिमत्व आदरणीय ठरले ते त्यामुळेच. त्यांच्या स्वातंत्र्य, समता, न्याय, विवेक, स्वयंशासन, साधी राहणी, विधायक विचार, साधनशुचिता अशा पैलूंचा जगभर स्वीकार झालेला दिसतो. आपल्या विचार, कृती व संघर्षमय जीवनातून या पैलूंना त्यांनी विशिष्ट स्थान मिळवून दिले. त्यांच्या विचारांचा एक-एक पैलू विचारात घेतला असता त्यांच्या या विचारांची सद्यस्थितीतील विज्ञाननिष्ठ प्रासंगिकता लक्षात येते. प्रस्तुत शोधनिबंधात त्यांच्या अहिंसा संबंधी विचारांवर प्रकाश टाकण्यात आला आहे.

**महात्मा गांधीजींच्या अहिंसेचे विज्ञान:**

अहिंसा हे फक्त तत्व नव्हे तर जीवनप्रणाली आहे. सर्वांप्रती प्रेम, विश्वव्यापी प्रेम म्हणजे अहिंसा होय. महात्मा गांधीजींची अहिंसा ही विज्ञाननिष्ठ होती. गांधींच्या मते अहिंसा हा सत्य जाणून घेण्याचा, सत्यापर्यंत पोहोचण्याचा मार्ग होता. मात्र त्यांची अहिंसेची संकल्पना संकुचित नव्हती. शारीरिक इजेशिवाय प्रत्येक कुविचार म्हणजे हिंसा होय. उतावळेपणा, मिथ्या भाषण, मत्सर, एखाद्याचे अहित चिंतने म्हणजे हिंसाच होय.१ गांधींची अहिंसेची संकल्पना व्यापक होती हे यावरून ध्यानात येते. ब्रिटिशांनी तलवारीच्या जोरावर हा देश जिंकला. हिंसा हे त्यांच्या साम्राज्याचे अधिष्ठान होते. त्यामुळे ब्रिटिश हे हिंसेचे समर्थक आहेत असा भारतीयांचा आक्षेप होता. त्यावर गांधीजींचे भाष्य असे होते की, इंग्रजांना आपले रक्ताने माखलेले हात धूऊन टाकायावास सांगण्याआधी आपण आपले हात स्वच्छ करावयास हवे.२ यावरून हिंसेला कोणत्याही तात्विक चौकटीत बसविण्यास महात्मा गांधीजी तयार नव्हते. दक्षिण आफ्रिकेतील श्वेत राजवटीविरुद्ध, भारतातील इंग्रजांविरुद्ध, कलकत्ता येथील सांप्रदायिक दंगलीमध्ये त्यांची अहिंसा अत्यंत प्रभावी ठरली. "प्रिय गांधीजी, पंजाबमध्ये आमचे ५५ हजार सैनिक आहेत आणि आमच्या हातावर मोठ्या प्रमाणावर दंगल होत आहे. बंगालमध्ये आमच्या सैन्यात एका माणसाचा समावेश आहे आणि तेथे दंगा नाही. सर्व्हिंग ऑफिसर, तसेच प्रशासक म्हणून, मला वन-मॅन बाउंड्री फोर्सला श्रद्धांजली वाहण्याची परवानगी मिळू शकेल," [३] हे उद्गार आहेत ब्रिटिश ग.ज.लॉर्ड माउंटबॅटनचे अहिंसेच्या या व्यक्तिमत्वाचे माउंटबॅटनने सार्थ शब्दात केलेले वर्णन एका दुर्बल वृद्धाने काय साध्य केले हे दाखवून देण्यास पुरेसे आहे. महात्मा गांधी आज काळाच्या पडद्याआड गेले तरी त्यांचे कितीतरी विचार काळाच्या बंधनापलिकडचे आहेत. धारासनामधील मिठाच्या सत्याग्रहात ब्रिटिश सैनिक स्त्री-पुरुषांना हत्यारांनी मारहाण करीत आहेत. कवट्या फुटत आहेत, रक्त वाहत आहे, पण अहिंसक सत्याग्रही हातही उचलत नाहीत. ते उचलू शकतात, पण ते उचलत नाहीत. आणि त्याचा जागतिक प्रभाव निर्माण झाला.[४] त्यामुळे महात्मा गांधींच्या अहिंसेच्या मुळाशी काही शास्त्र निश्चित होते असे दिसून येते.

प्रत्येकाच्या हृदयात प्रेम आणि दयाभाव असतोच. निसर्गाचा तो अविष्कार आहे. हा अहिंसेच्या परिणामकारकतेचा आधार आहे. याउलट हिंसेमध्ये कोणीतरी तुम्हाला मारतो, त्यामुळे तुम्हाला राग येतो आणि तुम्ही उलटून परत मारता. ही हिंसेची प्रतिक्रिया आहे. त्यामुळे गांधी म्हणतात की, डोळ्याच्या बदल्यात डोळा असा विचार केला तर लवकरच संपूर्ण जग आंधळे होईल.५ हिंसेच्या विरोधात हिंसाच निर्माण होते. या संदर्भात विनोबा भावे असे म्हणतात की, "हिंसक युद्धात तुम्हाला अधिकाधिक विनाशकारी शत्रे वापरावी लागतात. अहिंसक संघर्षात याच्या उलट परिस्थिती असते. तुमचा प्रतिसाद सौम्यात सौम्य असावा म्हणजे हिंसाचाराचे चक्र खंडित होईल आणि तुम्हाला अधिक सौम्य परिणाम मिळतील."[६] महात्मा गांधींच्या मते, अहिंसा ही हिंसेपेक्षा श्रेष्ठ आहे. क्षमा करण्यामध्ये शिक्षेपेक्षा अधिक शौर्य आहे, परंतु दंड देण्याची शक्ती असून देखसील दंड न देणे ही खरी क्षमा होय. 'सौम्य,



Scanned with OKEN Scanner

सौम्य-तर और सौम्य-तम' हे अहिंसेचे खरे शास्त्र होते. विनोबा पुढे म्हणतात, "खऱ्या अहिंसक स्थितीमध्ये कोणीही तुमचा प्रतिपक्षी नसतो, कोणीही तुमचा शत्रू नसतो."[७] या गोष्टीचा खोलवर विचार केला तर असे दिसून येते की, महात्मा गांधींच्या अहिंसेमागे जनकल्याणाचा विचार होता. मात्र तो फक्त जनकल्याणाचा नव्हे तर शास्त्रीय कसोटीस उतरणारा शास्त्रपूत मार्ग होता. सत्य आणि अहिंसा या सामर्थ्यवान व अपराजित शक्ती आहेत. जेव्हा हा मार्ग तुम्ही स्वीकारता, तेव्हा तुम्ही सत्याग्रही बनता. म्हणूनच आपल्या अनुयायांनी 'सत्याग्रही वैज्ञानिक' व्हावे अशी गांधींची इच्छा होती. सत्यशोधनार्थ आपण अहिंसक असले पाहिजे, इतरांची मते आपण मोकळेपणाने स्वीकारली पाहिजेत, सत्य स्वीकारले पाहिजे. व सत्यापर्यंत पोहोचण्यासाठी अहिंसा हे तुमच्या मनाचे शास्त्र झाले पाहिजे. ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या विरोधात आपण टिकून राहू शकलो ते या अहिंसेमुळेच अशी गांधी व त्यांच्या अनुयायांची त्यामुळे पक्की भावना झालेली दिसून येते. सांप्रदायिक व जातीय दंगे यासंबंधी धोक्याची सूचना देतांना गांधी लिहितात, "अहिंसा हे असहकाराचे सर्वात महत्वाचे अंग आहे. आपण सर्व बाबतीत कमी पडलो आणि जर अहिंसक राहिलो तर आपल्याला आपला लढा चालू ठेवता येईल. पण जर अहिंसक वृत्तीला धरून राहण्यात कमी पडलो तर नामुष्कीची शरणागती आपल्याला पत्करावी लागेल. म्हणून अहिंसक असहकाराचा मार्ग अवलंबित असतांना आपण विचार, उच्चार, आचार या तिन्ही अहिंसक मार्गांना धरून वागण्याला प्रतिज्ञाबद्ध आहोत."[८] थोडक्यात अहिंसा हा मनुष्याचा स्थायीभाव असल्याने त्याने प्रश्न सुटतात तर हिंसेने प्रश्न अधिक बिकट होत राहतात. त्याचबरोबर अहिंसेने मनुष्यात बदल होतो, मनुष्याचा आजार बरा होतो व तो अन्याय करणे सोडतो. अहिंसा मनुष्यामनुष्यामधले परस्पर प्रेमाचे नाते पक्के करते. त्यामुळे ब्रिटिशांविरुद्ध लढतानाही गांधीजींचे ब्रिटिश जनतेवर तितकेच प्रेम होते जितके भारतीय जनतेवर होते. या दृष्टीने विचार केल्यास गांधीजींची अहिंसेची विचारसरणी संपूर्ण जगासाठी आदर्श ठरते. गांधीजी फ़क्त एकाच परिस्थितीत हिंसा ठिक आहे असे सांगतात. गांधीजी म्हणतात, अहिंसा हे धैयवान माणसाच लक्षण आहे, भित्र्या माणसाचे नाही. भित्रटपणापेक्षा हिंसा बरी. थोडक्यात विविध प्रकारच्या परिस्थितीमधुन गेल्यानंतर गांधीजींनी अहिंसा हाच एकमेव मार्ग आहे हे पक्के केलेले दिसून येते. ***There are many causes that I am prepared to die for but no causes that I am prepared to kill for.***[९] जे देश आणि समाज अहिंसेच्या मार्गाचा अवलंब करतात त्यांनी आत्मसन्मान सोडून बाकी सगळ्याचा त्याग करायला शिकायला हवे. त्यामुळेच अहिंसा हे कुठल्या भित्र्या माणसाचे नाही तर उलट धाडसी माणसाचे लक्षण आहे असे गांधीजी म्हणतात. शिवाय गांधीजींची अहिंसेची शिकवणुक सर्वांनाच पाळणे शक्य असते. त्यासाठी शरीरयष्टी, हत्यारे, साधनसामग्री यांची कशाचीच आवश्यकता नसते. त्यामूळे गांधीजींची ही अहिंसात्माक चळवळ भारतातील सामान्य जनतेत प्रचंड लोकप्रिय झाली. गांधी म्हणतात, "सत्य आणि अहिंसा हे डोंगराइतके प्राचीन आहेत."[१०] म्हणजे एक प्रकारे त्यांचे म्हणणे असे होते की, त्यांचा शोध मी लावलेला नाही, ते निसर्गाच्या नियमांवर आधारित आहेत. निसर्गात जशी हिंसा असते, तशीच अहिंसा आणि प्रेम ही निसर्गात असतात. थोडक्यात महात्मा गांधींची अहिंसा ही भावनेच्या भरात व परिस्थितीच्या अधीन राहून त्यांनी स्वीकारली नव्हती तर त्यामागे एक निश्चित असे शास्त्रीय अधिष्ठान असल्याचे आपल्याला दिसून येते.

निष्कर्ष: महापुरुषांचे विचार हे एक तथ्य व उपदेशपर मार्गदर्शन म्हणून निश्चित उपयोगी आहेत, पण व्यावहारिक जीवनात ती उपयोगात आणतांना त्यावर नवीन चिंतनाची गरज भासते. मात्र २१ व्या शतकातील चंगळवाद, आत्यंतिक भांडवलशाही व त्यातून उद्भवणारी युद्धे यांचा विचार करता महात्मा गांधींचा अहिंसेचा विचार हा कधी ही कालबाह्य होऊ शकत नाही. इतिहासाचे मर्म सांगताना गांधीजींनी प्रेम हाच मानवतेचा स्थायीभाव असल्याचे आवर्जून सांगितले. वारंवार निर्माण झालेले कलह जर तलवारीच्या जोरावर सोडवले गेले असते तर मानवजात टिकलीच नसती. उलट, ती फोफावते आहे याचा अर्थ मानवी प्रेरणा मुख्यत: प्रेमाची व अहिंसेची आहे, हे वारंवार सिद्ध झाले आहे. गांधी म्हणतात, तुम्हाला जगात जो बदल पाहायचा आहे, तो तुम्ही स्वतःमध्ये घडवून आणा. आपले अहिंसेबद्दलचे विचार त्यांनी आपल्या जीवनात प्रत्यक्ष उतरविले. आधी स्वतः मध्ये इष्ट बदल घडविला. व मग त्याचा प्रत्यक्ष प्रयोग त्यांनी सुरु केला. म्हणूनच 'माझे जीवन हाच माझा संदेश' असे गांधीजी जे सांगतात ते त्यांचे विचार निश्चितच मोलाचे वाटतात.

संदर्भसूची:

1. http://shabdbooks.com/gallery/-79may%20spl.pdf ,last seen at 13/02/2022, at 7.36 am
2. साप्ताहिक साधना' ,महात्मा गांधी आणि मराठी साहित्य ,'संपादक विनोद शिरसाठ.१८.क्र.पृ ,२०२०फेब्रुवारी ०८ .दि ,
3. Dhiman Satinder, Gandhi and Leadership: New Horizons in Exemplary Leadership, Palgrave Macmillan; 2015th edition (16th July 2015), p.1
4. http://puneresearch.com/media/data/issues/5ea80fd1c521c.pdf , last seen at 13/02/2022, at 10.30 am.



Scanned with OKEN Scanner

E- ISSN 2582-5429
Akshara Multidisciplinary Research Journal
Peer-Reviewed & Refereed International Research Journal
February 2022 Special Issue 04 Volume VI (C) SJIF Impact- 5.54

5. https://nileshkate.3210wordpress.com/author/nileshskate/ ,last seen at 13/02/2022, at 9.11 am.
6. साप्ताहिक साधना' ,गांधीजींच्या कार्यपद्धतीमागचे विज्ञान ,'संपादक विनोद शिरसाठ .दि ,२९ जानेवारी २०२२.क्र.पृ ,३८.
7. तत्रैव.३९ .क्र .पृ ,
8. गांधी विचार दर्शन.२७ .करा .पृ ,सत्याग्रह स्वराज्य -
9. https://www.facebook.com/unitednations/photos/there-are-many-causes-that-i-am-prepared-to-die-for-but-no-causes-that-i-am prep/ ,/10154596540380820last seen at 15/02/2022, at 6.30 pm.
10. साप्ताहिक साधना' ,गांधीजींच्या कार्यपद्धतीमागचे विज्ञान ,'संपादक विनोद शिरसाठ .दि ,२९ जानेवारी २०२२.क्र.पृ ,४०.

□ □ □